GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
'Kalyan', 32, Natraj Society, Karve Nagar, Pune 411 052, India. Tel : 91.020.25443134
Email : grnearth@vsnl.com Visit us : www.greenearthconsulting.com

**मित्रांनो,**

सामाजिक कामाचे स्वरुप झपाट्याने बदलत आहे. पण याविषयी तक्रार करण्याचे कारण नाही. कारण कुठलीही जिवंत गोष्ट बदलणारच. प्रश्न, आपण ते बदल किती अंगीकारतो हा आहे.

येत्या ५ ते १० वर्षात आपण यापूर्वी ज्या पध्दतीने संस्था चालवित होतो तशा चालविता येणार नाहीत. त्या अधिक शिस्तबध्द, उत्तरदायी आणि प्रभावी असण्याची गरज आहे, तशा त्या नसतील तर त्यांना समाजमान्यता तर मिळणार नाहीच पण सामाजिक कामासाठी लागणारा पैसा आणि इतर मदतही मिळणार नाही. मोठ्या वेगाने पारंपारिक फंडिंग एजन्सीजना औद्योगिक कंपन्यांची फाऊंडेशन्स बाजूला सारत आहेत. औद्योगिक क्षेत्रातून सामाजिक कार्यासाठी बऱ्याच संधी येत्या काळात उभ्या राहणार आहेत.

मात्र त्यासाठी नुसती वाट बघून उपयोग नाही. **आपण, आपला ढाचा, आपली कार्यपध्दती, आपली कार्यसंस्कृती यामधे अमूलाग्र बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे.**

हा बदल ओळखून आम्ही नव्या युगाच्या नव्या स्वयंसेवी संस्थांसाठी नव्या व्यवस्थापनाचा नवा मंत्र घेऊन एका नव्या प्रशिक्षणाची आखणी केली आहे.

प्रशिक्षण चांगले व्हावे आणि प्रत्येक प्रशिक्षणार्थीला उत्तम वेळ देता यावा म्हणून प्रशिक्षणार्थींची संख्या २५ पेक्षा जास्त असणार नाही. त्यामुळे आपल्याला या प्रशिक्षणामधे रस असल्यास त्वरित संपर्क साधावा. आपण नाव नोंदवल्यानंतर आपल्या नेमक्या गरजांप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम अधिक नेमका होण्यासाठी आम्ही प्रयत्न करु. तपशील मागे देत आहे.

एकजुटीची आठवण
चांगभलं !

**अनिल शिदोरे**
**प्रमुख प्रशिक्षक**

## या प्रशिक्षणाचे प्रमुख विषय

**१. संस्था कशी चालवू नये, अर्थात कशी चालवावी ?**

दिशा, उद्दिष्टे, गटबांधणी, प्राधान्यविषय, हेतू, कार्यसंस्कृती, वेळेचे नियोजन.

**२. स्वयंसेवी क्षेत्रातील आपले आई-बाप कोण ?**

संस्था आणि चळवळींचा इतिहास आणि नागरिकशास्त्र.

**३. आपल्या संस्था कायद्याच्या कचाट्यात सापडू नयेत म्हणून ...**

८०G - १२A - FCRA आणि FCMC - नमुना अर्जासहीत सविस्तर माहिती.

**४. फंडींग एजन्सीजचा आगा पिछा**

महाराष्ट्रात काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या फंडींग एजन्सीज - त्यांचे प्राधान्यक्रम - त्यांचे हेतू आणि इतर सर्व लेखी तपशील

**५. खऱ्या कामालाच खरा 'अर्थ'**

फंडींग मिळवण्याचे इतर सर्व मार्ग - संस्थेचे उत्तरदायीत्व - कामातील पारदर्शकता

**६. नव्या युगाच्या नव्या गरजा :**

स्वयंसेवी क्षेत्रासमोरील भविष्यकाळातील आव्हाने

## प्रशिक्षण पध्दती ...

- खेळ - मनाचे व्यायाम, बुद्धीची कसोटी
- खोलवर आणि नवा विचार करायला प्रवृत्त करणाऱ्या चर्चा
- कृतीप्रवण व्याख्याने आणि संपूर्ण शंका निरसन
- वेगळं काहीतरी करुन दाखवण्याची ऊर्मी आणि ऊर्जा इथे मिळेल.

या प्रशिक्षणातील तुमच्या कामगिरीवर आधारित गुण आणि प्रमाणपत्र दिली जातील.

**मुख्य प्रशिक्षक - अनिल शिदोरे** सहाय्यक - मकरंद सहस्त्रबुध्दे, विनीता ताटके, जयश्री शिदोरे

प्रशिक्षण कालावधी - **दि. १६ ते २० जानेवारी २००७** स्थळ :- **भारतीय शिक्षण संस्था, पुणे.**

प्रशिक्षणाची फी : रु. ३०००/- (सर्व खर्चासहीत). संपर्काची शेवटची तारीख दि. ३१ डिसेंबर, २००६.

**तुमचा होकार पत्राने कळवलात की ताबडतोब तुम्हाला फॉर्म पाठवू. या प्रशिक्षणाकडून तुमच्या काही नेमक्या अपेक्षा असतील तर जरूर कळवा. त्यांना जास्तीत जास्त न्याय देण्याचा प्रयत्न निश्चीतपणे करू.**

संपर्क - **विंदा बाळ**

३२, कल्याण, नटराज सोसायटी, कर्वेनगर, पुणे - ४११०५२.

फोन - (०२०) २५४५०८८१ मोबाइल - ९४२३००३८४२ ई-मेल - grnearth@vsnl.com